बोगस वैद्यकीय व्यावसायिक शोधून काढण्यासाठी जिल्हा स्तरावर तसेच तालुका स्तरावरील समितीच्या अधिकारात वाढ करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
शासन निर्णय क्रमांकः न्यायप्र-०११९/प्र.क्र.०६/अधिनियम
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: २२ जानेवारी, २०१९.

**वाचा -**

१) शासन निर्णय क्रमांकः सीआयएम-१०९१/सीआर-१७२/९१/एमईडी-८, दि. ५ सप्टेंबर, १९९१.
२) शासन निर्णय क्रमांकः सीआयएम-१०९९/प्र.क्र.३५५/९९/अधिनियम, दि. ७ फेब्रुवारी, २०००.
३) शासन निर्णय क्रमांकः सीआयएम-१०९९/प्र.क्र. ३५५/९९/अधिनियम, दि. ५ डिसेंबर, २००१
४) शासन निर्णय क्रमांक- सीआयएम-१०९९/१७२६/प्र.क्र.३५५/९९/अधिनियम, दि. ५ फेब्रुवारी २००३.

**प्रस्तावना -**

राज्यातील बोगस वैद्यकीय व्यावसायिकांना आळा घालण्याकरिता संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णय दि. ५ सप्टेंबर, १९९१ अन्वये असे बोगस वैद्यकीय व्यावसायिक शोधून काढण्यासाठी जिल्हा, तालुका, महानगरपालिका आणि नगरपालिका स्तरावर समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. तसेच बोगस वैद्यकीय व्यावसायिकांची दिवसेंदिवस वाढत गेलेली संख्या पाहता प्रतिबंधात्मक कारवाई करण्याच्या अनुषंगाने वेळोवेळी उपरोक्त संदर्भीय क्र. २,३ व ४ येथील शासन निर्णय निर्गमित करण्यात आले होते.

सद्यस्थितीत रिट याचिका क्र. ७९६४/२०१६ डेंटल मॅकेनिक असोसिएशन व इतर विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर या याचिकेमध्ये याचिकाकर्त्यांने दंतवैद्य अधिनियम १९४८ अंतर्गत शासनाने अनधिकृत डेंटल लॅब चालविणाऱ्या दंत कारागीर व तंत्रज्ञ यांच्या विरुध्द कारवाई करावी अशी मागणी केली आहे. यास अनुसरुन वेळोवेळी झालेल्या सुनावणीच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने अनधिकृत/ बोगस दंत कारागीरांविरोधात लवकरात लवकर कारवाई व्हावी असे शासनास आदेश दिले आहेत.

सद्यस्थितीत संदर्भिय शासननिर्णयाप्रमाणे महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ च्या कलम ३३, ३३(अ) व ३८ नुसार बोगस वैद्यकीय व्यवसायिकाविरुद्ध विविध स्तरावरील समित्यांद्वारे

कारवाई करण्यात येते. परंतु सदर अधिनियमात बोगस दंतवैद्य/दंत आरोग्य रक्षक/दंत कारागीरांविरुध्द कारवाई करणे अंतर्भूत नसल्याने आणि असे बोगस दंतवैद्य/दंत आरोग्य रक्षक/दंत कारागीरांची महाराष्ट्रात संख्या वाढत असल्याने नागरिकांचे मौखिक तथा संपूर्ण आरोग्य धोक्यात आले आहे. याकरिता अनधिकृत /बोगस दंतवैद्य/दंत कारागीरांविरुध्द न्यायालयात तक्रार दाखल करण्याकरिता दंत वैद्य अधिनियम १९४८ च्या कार्यकक्षेत राहून कार्यवाहीचे अधिकार समितीला प्रदान करण्याकरिता उपरोक्त विविध स्तरावरील कार्यरत समितीच्या अधिकारात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय -

राज्यातील बोगस वैद्यकीय व्यावसायिकांना आळा घालण्याकरिता संदर्भिय शासन निर्णय क्र. १ द्वारे गठीत करण्यात आलेल्या समित्यांच्या अधिकारात वाढ करुन त्यांना दंतवैद्य अधिनियम, १९४८ च्या कलम ४७,४८,४९,५० व ५१ अंतर्गत अनधिकृत/ बोगस दंतवैद्य/ दंत आरोग्यरक्षक/ दंतकारागीर (Dental Hygienist/ Dental Mechanic )यांचा शोध घेऊन यांच्याविरुध्द कारवाई करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

२. समित्यांनी विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार उपरोक्त दंतवैद्य अधिनियमातील तरतूदीनुसार गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(सुरेन्द्र प्र. चानकर)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राज भवन , मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (वै.शि.) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

६. अपर मुख्य सचिव, (महसूल) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव, (विधी विधान), विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
११.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१३.सर्व महानगरपालिका आयुक्त
१४.सर्व पोलीस आयुक्त
१५.सर्व जिल्हा दंडाधिकारी
१६.सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक
१७.सर्व उपजिल्हा पोलीस अधिक्षक (मुख्यालय)
१८.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१९.संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२०.सर्व जिल्हा शल्य चिकित्सक
२१.सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी
२२.सर्व गट विकास अधिकारी (पंचायत समिती)
२३.सर्व नगरपालिका/ नगरपरिषदा/नगरपंचायत
२४.निबंधक, महाराष्ट्र राज्य दंत परिषद, मुंबई
२५.प्रबंधक, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, मुंबई.
२६.प्रबंधक, महाराष्ट्र भारतीय औषध परिषद, मुंबई
२७.प्रबंधक, महाराष्ट्र होमिओपॅथी परिषद, मुंबई
२८.सर्व सहसचिव, उपसचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
२९.निवडनस्ती, अधिनियम कार्यासन.